# स्त्री-पुरुष एक समान, सांगतय आपलं संविधान!

नमस्कार बहिण-भावांनो,

महिलांनी आपल्या अधिकारांसाठी केलेल्या संघर्षाची आठवण करून समानतेसाठी आपला लढा दृढ करण्याचा दिवस म्हणून जगभरात 8 मार्च हा महिला दिन म्हणून पाळला जातो. जगभरात ज्या स्त्रियांनी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानतेसाठी लढा दिला, त्याच संघर्षाची प्रेरणा भारतातील महिला-स्वातंत्र्यलढ्यातही दिसून येते.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांनी केवळ देशाच्या राजकीय स्वातंत्र्यासाठीच नव्हे, तर स्वतःच्या अधिकारांसाठीही आवाज उठवला. कित्येक क्रांतिकारी महिला देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीद देखील झाल्या.



साहजिकच देशाच्या संविधान निर्मितीमध्ये त्यांचा सहभाग असणारच होता व त्यात **15 महिलांचा सहभाग होता**. स्त्रियांसंबधीचे धोरण ठरवण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. हंसा मेहता यांना घटनेवर सही करण्याचा बहुमान मिळाल्याने स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांच्या योगदानावर जणू सुवर्णमुद्राच उमटली.

## संविधानाने महिलांना काय दिले?

**भारतातील महिलांना सर्वप्रथम हक्क प्रदान केले ते भारतीय संविधानाने!**



1. **मतदानाचा अधिकार** भारत हा जगातील पहिला देश आहे, ज्याने स्वातंत्र्य मिळताच सर्व प्रौढ महिलांना मतदानाचा अधिकार दिला. ग्रामपंचायत ते लोकसभेपर्यंत निवडणुकीला उभे राहण्याचा हक्कही संविधानामुळेच मिळाला. अमेरिकेसारख्या विकसित देशाला तर त्यांच्या समाजातील सर्व महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी 1965 साल उजाडावे लागले.



2. **शिक्षणाचा अधिकार** संविधानापूर्वी फक्त श्रीमंत घरातील मोजक्याच मुली शिकायच्या. संविधानामुळे 'गाव तिथे शाळा' तत्वानुसार गावोगावी शाळा सुरू झाल्या आणि गरिब मुलींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला.
3. **लग्नाचे वय ठरवले** संविधान लागू होण्याच्या आधी लहानपणीच मुलींची लग्न लावून दिली जात असत. जरठ-कुमारी विवाहामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम व्हायचा. संविधानामुळेच महिलांच्या लग्नाचे वय 16 आणि नंतर 18 झाले.
4. **संपत्तीचा अधिकार** संविधानामुळेच आज वारशात महिलांना 50% संपत्तीचा अधिकार मिळाला. संविधानापूर्वी असा अधिकार नव्हता.
5. **प्रसूती रजेचा अधिकार** देश स्वतंत्र होण्याचा पूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व जाती-धर्माच्या महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा अधिकार दिला. संविधान बनल्यानंतर तो अधिकार कायम राहिला.
6. **महिला आरक्षण** हजारो वर्षांपासून शोषण झाल्यामुळे महिलांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी आरक्षणाची सुरुवात झाली ती संविधानामुळेच. आज महिला विविध ठिकाणी शिकून, घराबाहेर पडून नोकरी



करू शकल्या त्या संविधानामुळेच. सरपंचापासून ते मुख्यमंत्र्यापर्यंत आणि प्रधानमंत्री पासून राष्ट्रपती पदापर्यंत महिला पोहोचल्या त्या संविधानामुळेच. मात्र, महिला आरक्षणाचे स्वप्न आजही पूर्णपणे साकार झालेले नाही.

7. **समान कामाला, समान दाम** 'चूल-मूल' या चौकटीत कैद असलेल्या महिलांना समान, योग्य व न्याय्य मोबदला मिळवण्याचा अधिकार दिला. स्त्री-पुरुष यांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान हक्क दिला.

8. **हिंसाचार विरोधी कायदे** घरगुती हिंसाचार विरोधी कायदा असो वा कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा किंवा पॉस्को सारखे कायदे – महिलांच्या अधिकारासाठी हे सर्व कायदे संविधानामुळेच मिळू शकले.

9. **घटस्फोट घेण्याचा, विधवा पुनर्विवाहाचा हक्क** पूर्वी महिलांना घटस्फोट घेण्याचा आणि विधवा महिलांना पुनर्विवाहाचा हक्क नव्हता. संविधानामुळेच महिलांना घटस्फोट घेण्याचा आणि विधवा महिलांना पुनर्विवाहाचा अधिकार मिळाला. तसेच पोटगीचा अधिकार देखील महिलांना मिळाला.

10. सतिप्रथा, देवदासी प्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह प्रथा इ. सारख्या स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग केला पाहिजे असे संविधानात नमूद केले आहे.




पण संविधानाला निहीत असलेली स्त्री-पुरुष समानता येण्यासाठीचा लढा अजूनही चालूच आहे. **समानता, स्वातंत्र्य व सन्मान ही केवळ संविधानातील शब्द नसून स्त्रीच्या जगण्याची मूलभूत तत्त्वे आहेत.** संविधानाने महिलांना अधिकार दिले, पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव तेव्हाच येईल, जेव्हा समाज म्हणून आपण ते अधिकार मान्य करू, पाळू आणि संरक्षण करू. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, स्त्रीच्या निर्णय स्वातंत्र्याचा सन्मान करणे आणि समानतेसाठी संघटित होणे—हाच संविधानाचा खरा अर्थ आहे. तुम्हीही 'संविधान जागर अभियान' मध्ये सहभागी व्हा, असे प्रेमपूर्वक आवाहन!! **जय संविधान!**

## चला, महिलांच्या सन्मानासाठी संविधानाचा जागर करूया व महिला सन्मान शपथ घेऊया...

*जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मी अशी शपथ घेतो/घेते की, मी महिलांचा सन्मान करेन आणि कुणालाही महिलांचा अपमान करू देणार नाही. महिलांचा अपमान करणाऱ्या चित्रपट, गाणी, विनोद आणि शिव्यांचा मी विरोध करेन. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या रूढी-परंपरांचा मी त्याग करेन. मी महिलांवर होणारे हिंसाचार खपवून घेणार नाही आणि त्याविरोधात आवाज उठवेन. मी महिलांचा आदर करेन आणि कुणालाही महिलांचा अपमान करू देणार नाही. माझा परिसर, माझे गाव/शहर महिलांसाठी सुरक्षित आणि भयमुक्त बनविण्याचा प्रयत्न करेन.*

***मी संविधानाने दिलेल्या स्त्री-पुरुष समानतेच्या मूल्याचे सामाजिक व वैयक्तिक जीवनात पालन करेन आणि इतरांपर्यंत पोहोचवेन.***

## संविधान जागर अभियान

**निमंत्रक समिती:** मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, मा.न्या. टी.व्ही. नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 7972345764 डॉ. श्याम मडे: 9404708852 श्रद्धा रे. रा.: 9270478335 राजाभाऊ करवाडे: 98222 02739

**samvidhan.jagar** **samvidhanjagar.org**